महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर


कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २४ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कल्याण बाजार समितीतील व्यापाऱ्यांचा बंद यशस्वी !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापाऱ्यांनी बाजार समितीवरील प्रशासनाच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ बुधवारी एक दिवसाचा लाक्षणिक बंद पुकारला आहे. या बंदमध्ये बाजार समितीमधील सर्व व्यापारी, माथाडी संघटना सहभागी झाल्याने बाजार समितीमधील सर्व व्यवहार ठप्प पडले आहेत. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात दररोज नाशिक, अहिल्यानगर, जुन्नर, पुणे परिसरातून भाजीपाल्याचे सुमारे ४५० ट्रक येतात. फळांचे १५० ट्रक, फुलांचे २०० ट्रक येतात. याशिवाय विविध प्रकारचे धान्य वाहू सुमारे शंभरहून अधिक वाहने येतात. बाजार समितीत बंद असल्याने पुरवठादार व्यापाऱ्यांनी बुधवारी बाजार समितीकडे पाठ फिरवली. कल्याण, डोंबिवली, मुरबाड, कसारा, शहापूर, भिवंडी परिसरातील किरकोळ व्यापाऱ्यांना या बंदचा सर्वाधिक फटका बसला. बाजार समितीत दररोज सुमारे दीड कोटी रूपयांची उलाढाल होते. बंदमधील व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीवर ठाणे जिल्हा सहकारी संस्थेचे उपनिबंधक डॉ. किशोर मांडे प्रशासक म्हणून काम पाहत आहेत.






बाजार समिती संचालक मंडळ निवडूक काळात आदर्श आचारसंहिता लागू होती. या कालावधीत प्रशासक डॉ. मांडे यांनी बाजार समिती विकास आराखड्यातील पाच हजार चौरस मीटरच्या सुविधा भूखंड घाईने दहा वर्षाच्या

> **बाजार समितीवरील प्रशासकाच्या मनमानीच्या निषेधार्थ बाजार समितीमधील सर्व व्यापारी संघटनांनी कडकडीत बंद पाळला आहे. व्यापारी संघटनेला भूखंड देण्यास कोणाचा विरोध नाही, फक्त तो देताना सर्व नियमांचे पालन व्हावे अशी संघटनांची अपेक्षा आहे.**
> **रवींद्र घोडविंदे , (सभापती) कल्याण बाजार समिती.**

भाडेपट्ट्याने लक्ष्मी भाजी बाजारातील व्यापारी संघटनेला देण्याचा निर्णय घेतला. बाजार समितीमधील व्यापारी संघटनांना विश्वासात न घेता हा भाडेपट्टा करार करण्यात आला आहे. या जागेवर येणाऱ्या काळात कोणीही तात्पुरते, कायमस्वरुपी बांधकाम करून गाळे उभारणी केली तर बाजार समिती आवारातील वाहतुकीला त्याचा मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. सर्व व्यापारी संघटनांचे म्हणणे ऐकून न घेता, संचालक मंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी, मनमानी पध्दतीने हा भूखंड प्रशासकांनी भाडेपट्टा कराराने दिल्याने प्रशासकाच्या निषेधार्थ बुधवारी लाक्षणिक बंद पुकारण्यात आला आहे.

या बंदमध्ये फळ व भाजीपाला घाऊक विक्रेता संघ, कल्याण कांदा, लसूण, बटाटा घाऊक विक्रेता संघटना, कल्याण फूल विक्रेता संघटना, कल्याण फळ विक्रेता संघटना, ओम शिवम जनकल्याण वेलफेअर संघटना, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट जनरल कामगार संघटना सहभागी झाल्या आहेत. लोकनियुक्त संचालक मंडळ बाजार समितीवर आले तरी प्रशासक आपला कार्यभार समितीकडे सोपविण्यास तयार नसल्याची चर्चा आहे.

भाज्या, फळांची विक्री बाजार समितीमधून बुधवारी सकाळी ताजी फळे, ताजा भाजीपाला न मिळाल्याने कल्याण, डोंबिवली परिसरातील किरकोळ विक्रेत्यांनी आपल्या जवळील जुना भाजीपाला, फळे घेऊन विक्री सुरू केली आहे., या भाजीपाल्यांचे दर विक्रेत्यांकडून चढे लावण्यात आले आहेत. वडापाव विक्रेत्यांना बटाटे उपलब्ध न झाल्याने त्यांची सर्वाधिक कोंडी झाली.






## मेट्रो कारशेड खासगी जागेतच - शेतकऱ्यांचा जागा देण्यास होकार

**मेट्रो -१० ची निविदा ऑगस्ट अखेरपर्यंत**

**भाईंदर :** भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथील डोंगरी येथील शासकीय जागेमध्ये मेट्रो कारशेड ९ उभारण्यात येणार आहे. या कारशेडमध्ये जवळपास १२ हजार ४०० झाडे तोडावी लागणार आहेत. त्यामुळे पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी उत्तन येथील खोपरा गावातील खासगी जमिनीवर उभारण्यात यावे, यासाठी या जमीन मालकांनी जमिनीचा योग्य मोबदला देऊन जमीन देण्यास तयारी दाखवली आहे. यासाठी जमीन मालकांनी एमएमआरडीए अधिकाऱ्यांना सोमवारी प्रस्ताव दिला आहे. यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळता येईल, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

मेट्रो मार्गिका क्र. ९ दहिसर ते भाईंदर काम सुरू आहे, या मेट्रोसाठी मेट्रो कारशेड हे भाईंदर पश्चिमेच्या उत्तनच्या डोंगरी परिसरातील ५९ हेक्टर शासकीय जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी निश्चित केली आहे. उत्तनच्या डोंगरी येथील शासकीय जागेत मेट्रो कारशेड स्थलांतरित केल्यामुळे त्या ठिकाणी कारशेड उभारताना सुमारे १२ हजार ४०० झाडे तोडण्यात येणार आहेत. यामुळे डोंगरी येथील स्थानिक रहिवासी तसेच पर्यावरणप्रेमींनी या कारशेडला तीव्र विरोध केला आहे. आराखड्यानुसार स्थलांतरित कारशेडची निविदा प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून पूर्ण करण्यात आली आहे. मेट्रो कारशेड अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी मुंबई येथील एमएमआरडीएच्या कार्यालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार व इतर वरिष्ठ अधिकारी, मीरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा, पर्यावरणप्रेमी धीरज परब, माजी नगरसेवक अजित गंडोली, बॉनी डिमेलो आदी उपस्थित होते.

मीरा-भाईंदर महापालिकेच्या प्रस्तावित मेट्रो-९ ची कारशेड मार्गिका मौजे उत्तन (खोपरा) येथे शेतकऱ्यांच्या मालकीची खासगी जमीन मिळकत १०० एकर आहे. ही जमीन १९९७ च्या विकास आराखड्यातील ४५ मीटर रुंद (१५० फूट) रस्ता, गावाच्या मागील नियोजित आराखड्यात दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे या खासगी जमिनीवर नियोजित मेट्रो-९ कारशेड स्थलांतरित केल्यास ही मार्गिका मोर्वा गावाच्या मागे असलेल्या सरकारी खाजण जमिनीतून नेता येईल. तसेच खासगी जमीन मिळकतीत नियोजित मेट्रो-९ कारशेडचे निर्माण करतांना कोणत्याही प्रकारची वृक्षतोड अथवा पर्यावरणाची हानी होणार नाही.

## नऊ तासांचा शट डाऊन आज भिवंडीत पाणी नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** आज बृहन्मुंबई महानगरपालिककडून देण्यात आलेल्या जलजोडणीवर नविन जलमापक बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. परिणामी सकाळी १०.०० वाजेपासून ते सांय ७.०० वाजे पर्यंत ०९ तासांचा शटडाऊन घेण्यात आलेला आहे.तरी गुरुवार दि. २४/०७/२०२५ रोजी सकाळी १०:०० ते ७.०० वाजे पर्यंत ०९ तासांकरीता पाणी पुरवठा बंद राहणार आहे व पुढील १ दिवस कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे. याची नागरिकांनी नोंद घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# भातसा धरणाचे दोन दरवाजे उघडले

**१ हजार २७८.४० क्यूसेक वेगाने विसर्ग ● नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ता. २३ :** मुंबईची तहान भागविणाऱ्या भातसा धरण क्षेत्रात मुसळधार पावसाचा जोर सुरू असल्याने बुधवारी धरणाचे दोन दरवाजे ०.२५ सेमीने उघडण्यात आले. धरणातून सध्या १ हजार २७८.४० क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू असून भातसा नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, संततधार कोसळणाऱ्या पावसामुळे मुंबईकरांची पाण्याची चिंता मिटली आहे.

भातसा धरणाच्या सतत पाऊस पडत असून, बुधवारी सकाळपर्यंत ४२ मीमी पावसाची नोंद झाली होती. आतापर्यंत एकूण पावसाची नोंद १ हजार ६२१ मीमी झाली आहे. सध्या धरणाची पाणी पातळी १३८ मीटरवर पोहोचली आहे. भातसा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने भातसा नदी काठच्या परिसरातील गावांना, विशेषतः शहापूर-मुरबाड रस्त्यावरील सापगाव पुलाच्या परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

प्रशासनाकडून नागरिकांनी नदीच्या काठावर जाऊ नये, पुलावर गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. धरणाचे एक व पाच क्रमांकाचे दरवाजे ०.२५ सेमीने उघडण्यात आले असल्याचे भातसा धरण विभागाचे कार्यकारी अभियंता रवी पवार यांनी सांगितले. या वेळी जलसंपदा विभागातील अधिकारी उपस्थित होते.



### जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या नेतृत्वाखाली
## मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मोतीबिंदूसारख्या आजारामुळे होणाऱ्या अंधत्वाचे उच्चाटन करणे आणि नेत्रविकाराच्या लवकर निदानासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे झाले आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत संपूर्ण राज्यात 'मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र विशेष अभियान राबविले जात आहे. हे ठाणे जिल्ह्यात देखील या अभियानास सुरुवात झाली असून २२ जुलै ते २२ ऑगस्ट २०२५ या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाच्या पहिल्याच दिवशी ठाणे जिल्ह्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती समोर आली आहे. ठाणे जिल्ह्यात या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर ७ हजार १८२ मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. ही मोहीम ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या नेतृत्वाखाली प्रभावीपणे राबवली जात आहे. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात व्यापक पातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मोतीबिंदू रुग्णांची मोफत नेत्रतपासणी करणे, आवश्यक रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रिया करणे, तपासणीपूर्वी आणि नंतरची औषधे पूर्णतः मोफत देणे, निवडक रुग्णालयांमध्ये रुग्णांना ने-आण करण्याची सुविधा देणे तसेच या अभियानाच्या जनजागृतीसाठी शालेय विद्यार्थी, आशा कार्यकर्त्या आणि ग्रामस्थांना सहभागी करुन घेणे असे 'मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र' या अभियानाचे वैशिष्ट्ये आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मार्फत देण्यात आली.

# रामीचा डाव भोवणार ? कृषीमंत्री पायउतार होणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे विधानसभेतील रमी प्रकरण राजकारणात चांगलेच तापले असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी दिवसागणिक जोर धरू लागली आहे. मात्र, मी काही चुकीचे केलेच नाही असे म्हणत कोकाटे यांनी कृषिमंत्री पदाचा राजीनामा देणार नसल्याचे जाहीर केले. मात्र, आता कोकाटे यांच्याकडून कृषी खातं काढून घेतलं जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

रमी प्रकरणाविषयी कोकाटे यांनी आपली बाजू स्पष्ट जरी केली असली तरी, त्यांच्या काही वक्तव्यामुळे पक्षाने त्यांच्याविषयी नाराजी देखील व्यक्त केली आहे. त्यामुळेच त्यांचे मंत्रीपद ताबडतोब रद्द केले जाणार नाही, मात्र त्यांना कृषी खात्याच्या जबाबदारीतून हटवले जाणार असल्याचे म्हंटले जात आहे. त्याऐवजी त्यांना सध्या मकरंद पाटील यांच्याकडे असलेले मदत आणि पुनर्वसन खातं सोपवले जाईल, असा अंदाज आहे. विधानपरिषदेत रमी खेळणे,शेतकऱ्यांसंदर्भात वारंवार वादग्रस्त वक्तव्य करणे यामुळे माणिकराव कोकाटेंविषयी नाराजी वाढत चालली आहे. तसेच त्यांची वक्तव्य सरकारला अडचणीत टाकणारी ठरत आहेत. पण म्हणून त्यांना मंत्रीपदावरून तात्काळ काढणे योग्य ठरणार नसल्यामुळे, फक्त त्यांच्या खात्यात बदल केले जाणार असल्याचे पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे मत आहे. एकंदर; राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हा खूप अडचणीत सापडल्याचे दिसत आहे. कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागल्याने कोकाटे यांचं खात बदलणार असल्याची माहिती समोर येत आहे.



**अजित दादांचा कोकाटेंना काम सुरु ठेवण्याचा सल्ला ?**

# कसारा लोकलवर दरड कोसळली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंबईहून कसाऱ्याला येणारी लोकल रात्री ९ वाजताच्या दरम्यान कसारा रेल्वे स्थानकात येत असताना प्लॅटफॉर्मसाठी ट्रॅक बदलत असताना ट्रॅक लगत असलेल्या टेकडीवरील दरड लोकलवर कोसळली. यात दरवाजात उभ्या असलेल्या दोन प्रवाशांना गंभीर दुखापत झाली असून मोटरमनने सावधगिरीने लोकल कसारा स्थानकात आणली.

मंगळवारी रात्री ९च्या सुमारास मुंबईहून कसारासाठी येणारी लोकल प्लॅटफॉर्म नंबर चारवर येण्यासाठी ट्रॅक बदलत असताना अचानक लोकलवर दरड कोसळली. काही प्रमाणात दरड ही अर्ध्या लोकलमध्ये तर अर्धी दरड ट्रॅकलगत पडली. मातीचा मलबा, छोटे-मोठे दगड व छोटी झाड खाली आली.

या अचानक कोसळलेल्या दरडीमुळे दरवाजात उभे असलेले प्रवासी बाळू जाधव, रा. पंचशील नगर,



तुकाराम जाधव रा. शिवाजी नगर कसारा हे गंभीर जखमी झाले. या दरडीमुळे गंभीर दुखापत झालेल्या जखमींना आपत्ती व्यवस्थापन टीम कसाराचे सदस्य प्रमोद वारंगुसे यांनी लोकलमधील सहप्रवाशांच्या मदतीने कसारा रेल्वे स्थानकात उपचारासाठी उतरवले. दरड पडलेल्या घटनेची माहिती रेल्वेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाला मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी रेल्वे ट्रॅकवर आलेले दरडीचे दगड बाजूला केले व ९ वाजून २१ मिनिटांनी मुंबईकडे लोकल रवाना केली.









## गीतासार



### अध्याय १७
### श्रद्धात्रयविभागयोगः

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः । अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥ १७-१७ ॥

फळाची इच्छा न करणाऱ्या योगी पुरुषांकडून अत्यंत श्रद्धेने केलेल्या वर सांगितलेल्या तिन्ही प्रकारच्या तपाला सात्त्विक तप म्हणतात. ॥ १७-१७ ॥

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् । क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १७-१८ ॥

जे तप सत्कार, मान व पूजा होण्यासाठी तसेच दुसऱ्या काही स्वार्थासाठीही स्वभावाप्रमाणे किंवा पाखंडीपणाने केले जाते, ते अनिश्चित तसेच क्षणिक फळ देणारे तप येथे राजस असे म्हटले आहे. ॥ १७-१८ ॥

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः । परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १७-१९ ॥

जे तप मूर्खतापूर्वक हट्टाने, मन, वाणी आणि शरीर यांना कष्ट देऊन किंवा दुसऱ्यांचे अनिष्ट करण्यासाठी केले जाते, ते तप तामस म्हटले गेले आहे. ॥ १७-१९ ॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ॥ १७-२० ॥

दान देणे कर्तव्य आहे, या भावनेने जे दान, देश, काल आणि पात्र मिळाली असता उपकार न करणाऱ्याला दिले जाते, ते दान सात्त्विक म्हटले गेले आहे. ॥ १७-२० ॥

## रेसिपी
### बीटरुट पराठा



रोज रोज मुलांसाठी खायला काय करायचं हा प्रश्न प्रत्येक गृहिणीला पडतो. घरात सहज उपलब्ध असलेल्या भाज्यांपासून आपण काही ना काही बनवत असतो. त्यातीलच बीट हा रक्त वाढीसाठी उत्तम पर्याय आहे. पण मुलांना ते आवडत नाही. म्हणून त्याला युक्ती म्हणून आपण येथे बीटाचा स्वादिष्ट पराठा कसा बनवायचा ते बघणार आहोत.

**साहित्य-**
पीठ- दोन कप
बीटरुट- एक
आमसूल पावडर
मीठ- चवीनुसार
तिखट

**कृती**
सर्वात आधी बीट धुवून किसून घ्या. आता एका पॅनमध्ये तेल गरम करा आणि बीटरुट शिजवा. बीटरुटचे पाणी सुकले की त्यात मसाले घाला. ताट झाकून ठेवा आणि मसाला २ मिनिटे शिजवा. आता मिश्रण थंड करा.एका वेगळया भांड्यात पीठ मळून घ्या आणि १० मिनिटे बाजूला ठेवा. आता त्याचे गोळे बनवा, त्यात मसाल्याचे मिश्रण भरा आणि पराठा लाटून घ्या. आता पॅन गरम करा आणि दोन्ही बाजूंनी तूप लावा आणि पराठा बेक करा. तयार केलेला पराठा लोणच किंवा चटणीसोबत सर्व्ह करा.

# पावसाळ्यात सर्पदंशाचा धोका

## सावध राहा, सुरक्षित रहा - जिल्हा परिषदेचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात सर्पदंशाच्या घटना वाढण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आरोग्य विभागास सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.त्याअनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी नागरिकांना सर्पदंशासंदर्भात योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि तत्काळ उपचाराचे महत्त्व समजावून सांगत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

### सर्पदंश झाल्यास काय करावे?

- रुग्णाला शक्य तितके स्थिर व शांत ठेवावे
- रुग्णाची हालचाल टाळावी, शक्य असल्यास उचलून घ्यावे
- दंश झालेला अवयव हृदयाच्या खाली ठेवावा
- जखमेवर साफ कपड्याने हलका दाब द्यावा – कसून बांधणे टाळा
- तात्काळ नजीकच्या आरोग्य केंद्रात रुग्णाला पोहोचवा
- श्वासोच्छ्वास अडचण असल्यास – CPR/ऑक्सिजन सुविधा वापरा (उपलब्ध असल्यास)
- शक्य असल्यास सापाचा फोटो घ्या (पण सापाला हात लावू नका)
- सर्पदंशाची वेळ लक्षात ठेवा

### सर्पदंश झाल्यास काय करू नये?

- पारंपरिक उपचारांवर (जडीबुटी, मंत्र, झाडफळं) विश्वास ठेवू नका
- जखमेवर चिरा करू नका, विष शोषू नका
- बर्फ किंवा गरम पाण्याचा वापर टाळा
- रुग्णास खाणे/पिणे देऊ नका
- वेदनाशामक, झोपेची औषधे किंवा मद्य देऊ नका
- सापाला पकडू किंवा मारू नका
- जखम कसून बांधू नका, त्यामुळे रक्ताभिसरण थांबते

### नागरिकांना आवाहन:

- रात्री बूट, टॉर्च, काठी वापरून बाहेर पडा
- परिसर स्वच्छ ठेवा, झाडेझुडपे व ओला कचरा हटवा
- झोपताना मच्छरदाणीचा वापर करा
- शेतात काम करताना गमबूट वापरा
- रात्री चालताना जोरात पावले टाका – साप दूर राहतात
- झोपताना शक्य असल्यास उंचावर झोपा
- मुलांवर विशेष लक्ष ठेवा
- १०२ / १०८ क्रमांकावर तत्काळ संपर्क साधा

### प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध सुविधा:

- ASV (Anti Snake Venom) उपलब्ध
- प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी
- अॅड्रेनालिन, अट्रोपीन, निओस्टिगमीन व इतर आवश्यक औषधे
- २४x७ उपचाराची व्यवस्था

# वसई तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि आगरी समाज विकास निधी वाटप समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : दिनांक 20.07.2025 रोजी लोकनेते, महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री, सन्माननीय नामदार श्री गणेश नाईक साहेब यांच्या हस्ते व कोकण विभागाचे शिक्षक आमदार सन्माननीय ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वसईतील गुणवंत विद्यार्थी व गुरुजन सत्कार समारंभ आणि आगरी समाज विकास निधी वाटप कार्यक्रम संपन्न झाला

या कार्यक्रमास वसई विरार शहर महानगरपालिकेचे माजी महापौर नारायण लखो मानकर साहेब अशोक भास्कर पाटील साहेब, भरत चिंतामण भोईर साहेब, मदन दादू किनी साहेब, विजय गोविंद किनी साहेब, चंद्रशेखर धुरी साहेब, हितेश रामचंद्र पाटील साहेब, श्री गणेश इंद्रजीत कमले साहेब, आणि आगरी समाजाचे अनेक कार्यकर्ते सभासद उपस्थित होते.

याप्रसंगी आगरी समाजाचे नाव उज्वल करणारे श्री राज नंदन भगत हे यूपीएससी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन असिस्टंट कमिशनर इन्कम टॅक्स विभागामध्ये कार्यरत झालेला आहे, त्याचबरोबर कुमारी करिष्मा किनी या आगरी विद्यार्थिनी मुलीने निरो सर्जन डिग्री प्राप्त डॉक्टरेट पदवी मिळवल्याबद्दल तिचा देखील सत्कार करण्यात आला, कुमार स्वयंतक पंकज पाटील हा लहान विद्यार्थी समुद्र जलतरणपटू आहे त्याचा देखील सत्कार करण्यात आला, कुमारी स्वरा दिगंबर पाटील बाल गिर्यारोहक यांचे विशेष सत्कार करण्यात आले. सोबतच गुणवंत विद्यार्थ्यांचे देखील सत्कार करण्यात आले.

यांप्रसंगी उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना आगरी समाजाने आता खूप मोठी प्रगती केलेली असून आगरी समाज हा प्रगत समजत म्हणून ओळखला जाऊ लागला आहे, आगरी समाजाची मुलं मोठ मोठे डिग्री संपादन करत आहेत मोठे संपादन करत आहेत यूपीएससी, डॉक्टरेट होऊन समाजाच नाव मोठे करण्याचे कार्य करत आहेत आपला समाज प्रगत असून आपण आगरी लोक साधी, भोळी आणि दुसऱ्यांना मदत करणारे आहोत प्रेमळ आहोत आणि म्हणून आपला उत्कर्ष होत आहे असे कोकण विभागाचे शिक्षक आमदार यांनी मत व्यक्त करून विद्यार्थ्यांना व पालकांना शुभेच्छा दिल्या.

# ठाणे महापालिकेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची जयंती साजरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : ठाणे महापालिकेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, कै. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या प्राची धारप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना केडीएमसीतर्फे अभिवादन !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात आज त्यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या समयी उपस्थित मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता घन:श्याम नवांगुळ, जयवंत विश्वास, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, सहा.माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

कल्याण (प) येथील टिळक चौकातील, लोकमान्य टिळक यांच्या पुतळयास उपआयुक्त प्रसाद बोरकर व संजय जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डोंबिवली (पू) पारसमणी चौकातील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास देखील सहा.आयुक्त हेमा मुंबरकर व संजयकुमार कुमावत यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या समयी इतर कर्मचारी वर्गाने देखील लोकमान्य टिळक यांच्या पुतळयास पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

# कामचुकार अधिकाऱ्यांना रोहन घुगे यांचा कारवाईचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : जिल्हा परिषदेचे कर्तव्यनिष्ठ मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी काल अचानक मुरबाड तालुक्यातील प-हें आणि न्हावे ग्रामपंचायतीला भेट दिली, यावेळी अनियमितता, भोंगळ व अनागोंदी कारभार,समन्वयाचा अभाव, आणि वरीष्ठांचे दुर्लक्ष ,इत्यादी गंभीर प्रकार प्रकर्षाने श्री घुगे यांच्या लक्षात आला. त्यामुळे त्यांनी संपूर्ण जिल्हा परिषदेच्या स्वतः सह , अतिरिक्त सीईओ, प्रकल्प संचालक, डेप्युटी सीईओ ( साप्र) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, ऐ बिडिओ, आणि विस्तार अधिकारी, असे सर्व येत्या १५ दिवसांच्या जवळपास ४३१ ग्रामपंचायतीची सखोल चौकशी करणार आहेत. यामध्ये चालढकल पणा किंवा कामचुकारपणा केल्यास त्यांचेवर देखील कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. अशी घटना ठाणे जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमच घडत असल्याचे समजते.

नुकतीच ठाणे जिल्हा परिषदेचे सीईओ रोहन घुगे यांनी मुरबाड तालुक्यातील काही ग्रामपंचायतीना भेट दिली. यामध्ये त्यांना ग्रामपंचायतीचा अनियमित ता भोंगळ, अनागोंदी, अनियमित कारभार निदर्शनास आला, त्यांनी २ ग्रामसेवकांना तडकाफडकी निंलबित केले आहे,इतकेच नव्हे तर सत्यता तपासण्या साठी ते अर्धा ते पाऊणतास बांधावरून चालत प-हें ग्रामपंचायतीच्या सरपंचांच्या घरी पोहचले. तेंव्हा तर ते भयानक संतापले, संपूर्ण जिल्हा परिषदेची परिस्थिती त्यांच्या लक्षात आली. वर्षानुवर्षे पेंडिग चौकश्या, कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, नोटिसा वर नोटिसा देऊन ही न झालेली कारवाई, काही कर्मचाऱ्यांना असणारे राजकीय पाठबळ यामुळे वरीष्ठांचे होणारे दुर्लक्ष, या सर्वांवर'रामबाण, उपाय सीईओ श्री घुगे यांनी योजला आहे, यासाठी त्यांनी २७ ऑक्टोबर २०१० च्या परिपत्रकाचा आधार घेऊन २८ जुलै २०२५ ते ११ ऑगस्ट २०२५ असा १५ दिवसांचा ग्रामपंचायत तपासणी मोहीम कार्यक्रम आयोजित केला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ चे नियम ३ नुसार ग्रामपंचायतीचे लेखे व वित्तीय अभिलेखे बाबत तरतूद असून त्यायोगे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतीचे अभिलेखे तपासण्यात येणार आहेत. या कालावधीत कोणी ही अनुपस्थित राहू नये अशा सूचना देण्यात आल्या असून यावेळी संबंधित ग्रामपंचायत अधिका-यांनी सर्व अभिलेखे उपलब्ध करून न दिल्यास कडक कारवाई चा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या इतिहासात आय ऐ एस स्वतः रोहन घुगे यांच्या सह संपूर्ण जिल्हा परिषदेच्या अधिकां-यांना कामाला लावण्याची ही पहिलीच घटना असून या लोकाभिमुख निर्णायाचे सर्व स्तंरातून स्वागत होत आहे.

# गेल पाईपलाईन विरोधात १३ गावांचा संताप | मोजणीला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील वाशी परिसरात गेल कंपनीच्या पाईपलाईन मोजणीसाठी आलेल्या पथकास स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला. मोजणीसाठी आलेले शासकीय अधिकारी, पोलीस बंदोबस्त आणि गेलचे प्रतिनिधी हे मोजणीस सुरुवात करणार होते. मात्र, अनेक गावांतील नागरिक, महिला, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहून शांततामय मार्गाने मोजणीला विरोध करून निषेध व्यक्त केला.

शेतकऱ्यांनी स्पष्टपणे प्रशासनास सांगितले की, "सुपीक जमिनीवरून ज्वलनशील प्रोफेन गॅस वाहून नेणारी पाईपलाईन आम्हाला मान्य नाही. आम्ही जमीन कोणत्याही मोबदल्यावर देणार नाही. आमच्या जिवावर आणि शेतीवर गॅस पाईपलाईन थोपवू नका." हे आंदोलन केवळ वाशीपुरते मर्यादित नसून, पेण तालुक्यांतील एकूण १३ गावांतील नागरिक गेलच्या भूमिगत पाईपलाईन प्रकल्पाच्या विरोधात एकवटले आहेत.

प्रोफेन गॅस हा अती-ज्वलनशील वायू असून, अशा धोकादायक पाईपलाईनची योजना मल्टीक्रॉप शेतीच्या मधोमध आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. हेटवणे सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात या जमिनी असून, भविष्यातील सिंचन आणि अन्नसुरक्षेचा समग्र प्रश्न यामुळे निर्माण होणार आहे.गेल व प्रशासनाने स्थानिकांशी कोणताही विश्वासार्ह संवाद साधलेला नाही. मोजणीपूर्वी शेतकऱ्यांना उचित व योग्य अशी नोटीस देण्यात आलेली नाही. ग्रामसभांचे ठराव, ग्रामस्थांच्या हरकती, आणि संघटनेचा विरोध याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले जात आहे. स्थानिक शेतकरी संघटनांच्या मते, "गेलचा हा प्रकल्प लोकशाहीची पायमल्ली आहे. पर्यायी मार्ग उपलब्ध असूनही सुपीक जमिनीवर प्रकल्प लादणे हे बेकायदेशीर आणि अन्यायकारक आहे."प्रकल्पासाठी पर्यायी मार्ग, जसे की विरार-खोपोली कोरिडॉर रस्त्याचा बफर झोन, समुद्रमार्ग, मुंबई-गोवा हायवे व रेल्वे ट्रॅक च्या बाजून समांतर असे चार-चार पर्याय असूनही यावर विचार न करता शेतकऱ्यांच्या, नागरीकांच्या जिवीताला धोका पोहचवणाऱ्या प्रकल्पास विरोध वाढत चालला आहे.

आजच्या निदर्शनातून एक स्पष्ट संदेश दिला गेला... आहे कि, आम्ही आमची गावं आणि आमचे स्वताःचे व इत्तरांचे जीवन व आमचे अस्तित्व आम्ही जमिनी गेल इंडियाला देवून आमच्या हाताने नष्ट करणार नाहीत. "ना जमीन, ना मोबदला, गॅस पाईपलाईन चा मार्ग बदला. या लढ्याचे नेतृत्व '24 गाव सेझ विरोधी शेतकरी संयुक्त कृती समिती पेण' व विविध सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते, सर्व सरपंच, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या हिमतीने करत आहेत. जनतेची अशीच साथ कायम राहीली तर पुढील टप्प्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, लाक्षणिक उपोषण आणि याचिकांच्या माध्यमातून कायदेशीर लढा दिला जाणार आहे अशी माहिती २४ गाव सेझ विरोधी शेतकरी संघर्ष समिती अध्यक्ष काशिनाथ पाटील यांनी दिली.

## आजचे राशि भविष्य



**मेष**
अशी एखादी व्यक्ती भेटेल जिच्याकडून तुम्हाला काहीतरी शिकायला मिळेल. ऑफिसच्या काही कामांमुळे अचानक प्रवास करावा लागू शकतो.

**वृषभ**
एकत्रितपणे केलेल्या कामात तुम्हाला मोठ्या प्रमाणात यश मिळेल.वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. उर्जेने खूप काही साध्य कराल.

**मिथुन**
कोणाशीही विनाकारण वाद घालू नका. यामुळे संबंध बिघडेल आणि तुमचे कामही विस्कळीत होईल. तुम्ही काही महत्त्वाच्या बाबींवर निर्णय घेऊ शकता.

**कर्क**
कोणताही निर्णय घेण्यात आराम वाटेल.आपल्या कुटुंबासाठी थोडा वेळ काढल्याने नात्यात गोडवा येईल. कामाचे परिणाम अनुकूल असतील.

**सिंह**
कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत संयम राखाल आणि तुमच्या परिस्थितीत लवकरच सुधारणा होताना दिसेल. तुमच्या यशाचा मार्ग सापडेल.

**कन्या**
फक्त तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. आज एखाद्या खास व्यक्तीच्या मदतीने तुमची प्रलंबित कामे पूर्ण होतील.काम पूर्ण गांभीर्याने होईल.

**तूळ**
तुम्हाला धार्मिक आणि सामाजिक कार्यात रुची असू शकते. कोणतीही योजना कृतीत आणली तर कोणतेही ध्येय साध्य होईल आणि मन प्रसन्न राहील. धार्मिक


**वृश्चिक**
घरात सुख-शांतीचे वातावरण राहील.दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. घरात निवांत आणि शांततापूर्ण वातावरण असेल.

**धनु**
तुम्ही काही महत्त्वाचे निर्णय घेऊ शकता जे तुमची आर्थिक स्थिती आणि घरातील व्यवस्था राखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**मकर**
घरातील वरिष्ठांचेही सहकार्य मिळेल. कामाच्या ठिकाणी वास्तुचे नियम पाळल्यास सकारात्मक परिणाम मिळतील.आरोग्य निरोगी राहील.

**कुंभ**
कार्यात तुमची आवड वाढेल. कामात व्यस्त राहा आणि अनावश्यक कामात रस घेऊ नका. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल आहे.

**मीन**
तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. तुम्हाला कामात जास्त मेहनत करावी लागेल, कामाची कार्यक्षमता कमी होऊ देऊ नका. व्यक्तिमत्व सुधारेल.






# अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वाड्यात 'जनविश्वास सप्ताह'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा, ता. २३ (बातमीदार):** लैंगिक शोषण किंवा अन्य कोणत्याही त्रासाच्या प्रसंगी मुली व महिलांनी भीती न बाळगता पोलिसांची मदत घेण्याचे आवाहन वाडा पोलिस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा होत असलेल्या 'जनविश्वास सप्ताह' अंतर्गत पालघर जिल्हा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा रोहिणी शेलार यांच्या नेतृत्वाखाली परळी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आणि वृक्षारोपण उपक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी दत्तात्रेय किंद्रे यांनी महिला कायदे व सायबर गुन्ह्यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच, राष्ट्रवादी महिला आघाडीने परळी येथे वृक्षारोपणही केले. या कार्यक्रमाला महिला राष्ट्रवादीच्या उपजिल्हाध्यक्षा चित्रा पाटील, वाडा तालुका सचिव रंजना भागडे, परळीचे सरपंच वैशाली पवार, पंचायत समितीचे माजी सभापती रघुनाथ माळी, पोलिस पाटील बबन पाटील, माजी उपसरपंच रुपेश दत्तू पाटील, परळी आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या.

# केडीएमसीने उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळील अनधिकृत बांधकामाविरोधात बेमुदत उपोषणाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. 23**

कल्याण पूर्वेतील काटेमानिवली परिसरात प्रभाग ५/ड कार्यालयाच्या शेजारी, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून उभारण्यात आलेल्या २१ कोटींच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ एका खासगी संस्थेने कोणतीही अधिकृत परवानगी न घेता कच्च्या स्वरूपाचे कार्यालय उभारले आहे. या अनधिकृत बांधकामाविरोधात तक्रारदार विनोद तिवारी यांनी महानगरपालिकेकडे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या प्रभाग ५/ड चे सहाय्यक आयुक्त उमेश यमगर यांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २६० (२) व ४७८ अंतर्गत संस्थेला कायदेशीर नोटीस बजावली.

या नोटीसमध्ये संबंधितांना १८ जुलैपर्यंत हे बांधकाम स्वतःहून हटवण्याचे आदेश देण्यात आले होते; मात्र मुदत संपूनही महापालिकेकडून कोणतीही प्रत्यक्ष कारवाई न झाल्याने तक्रारदार तिवारी यांनी बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

विनोद तिवारी हे २४ जुलैपासून प्रभाग ५/ड कार्यालयासमोर उपोषणाला बसणार असून, त्यांनी यासंदर्भात लेखी पत्र प्रभाग कार्यालय व कोळसेवाडी पोलिस ठाण्यात सादर केले आहे. विशेष म्हणजे, या बेकायदा टपरीस महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीने कोणतीही शहानिशा न करता ९ जुलै रोजी वीजजोडणी दिली आहे, असा गंभीर आरोपही तिवारी यांनी केला आहे. स्मारकाच्या परिसरात कोणतेही अतिक्रमण असू नये आणि तातडीने संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अन्यथा हे उपोषण अधिक व्यापक स्वरूप धारण करू शकते, असा इशारा तिवारी यांनी दिला.

# खोपोली घाटात कंटेनरची कारला धडक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खालापूर, ता. २३**

जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर सायमाळ गावाजवळ मंगळवारी (ता. २२) दुपारी अनियंत्रित कंटेनरची इको कारला धडक बसून झालेल्या अपघातात प्रवासी महिलेचा मृत्यू झाला.

अपघातात मृत्यू झालेल्या कारमधील महिलेचे नाव संध्या शंकर घोरपडे (६०) आहे. तर, चालक बाबू चंद्रकांत जाधव (३५), विद्या बाबू जाधव (३१), वैभवी बाबू जाधव (६) व देवाज्ञा बाबू जाधव (४, सर्व राहणार महाबळेश्वर) हे गंभीर जखमी झाले आहेत. मंगळवारी दुपारी अडीचच्या सुमारास जुना पुणे-मुंबई महामार्गावर सायमाळ गावाजवळ कंटेनर लोणावळ्याहून खोपोलीकडे जात होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो पुण्याकडे जाणाऱ्या कारवर धडकला. अपघातात जखमींना तातडीने खोपोली नगर परिषदेच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी खोपोली पोलिस ठाण्यात कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिक्षण उपयुक्तांच्या दालनात ठाकरे गटाचे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नेरूळ, ता. २३**

### जखमी झालेल्या विद्यार्थ्याला वेळेत रुग्णालयात न नेणाऱ्या शिक्षकांवर कारवाईची मागणी

शाळेला जखमी झालेल्या विद्यार्थ्याला वेळेत रुग्णालयात न नेणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. या मागणीसाठी शिक्षण उपयुक्तांच्या दालनात आंदोलन केले. कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर अखेर आंदोलन मागे घेण्यात आले. इंदिरानगर शाळेत एका विद्यार्थ्याने धक्का दिल्याने चौथीमधील विद्यार्थी जखमी झाला होता. रक्तस्राव होत असतानाही शिक्षकांनी आरोग्य केंद्रात विद्यार्थ्याला घेऊन जाण्याऐवजी पालकांना बोलावून घेतले. शिक्षकांच्या या बेजबाबदारपणावर कारवाई करावी, अशी मागणी ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील, प्रवीण म्हात्रे, महेश कोठीवाले यांच्या नेतृत्त्वाखाली शिष्टमंडळाने उपायुक्तांची भेट घेतली.

# आडिवलीच्या माजी नगरसेवकांनी घेतली केडीएमसी आयुक्तांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बेकायदा बांधकामांचे आगर म्हणून ओळखले जाणाऱ्या कल्याण पूर्वेतील आडिवली-ढोकळी प्रभागाचे माजी नगरसेवक कुणाल दिनकर पाटील यांनी दोन दिवसापूर्वी कल्याण डोंबिवली पालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांची त्यांच्या पालिका मुख्यालयातील दालनात भेट घेतली. त्यांना प्रभागातील नागरी समस्यांसंदर्भात एक निवेदन दिले. आडिवली ढोकळी प्रभागातील रस्ते आणि इतर नागरी समस्यांसंदर्भात हे पत्र असल्याची माहिती आयुक्त कार्यालयातून मिळाली.

## अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

कार्यालय: टिळकपथ, के. बी. रोड , अंबरनाथ जि. ठाणे पिनकोड. ४२१ ५०१
Website : www.ambarnathcouncil.net Phone No. 0251-2682353/18002331106

### विद्युत विभाग
### जाहीर कोटेशन नोटीस क्र. ०२/२०२५

मुख्याधिकारी अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांच्या वतीने विद्युत विभागाकडील अंबरनाथ नगरपरिषद कार्यक्षेत्रात सौर ऊर्जेवर व स्मार्ट AI प्रणालीवर आधारित पथदिवे यंत्रणा, वेब बेस नियंत्रण व देखरेख प्रणाली (CCMS) उभारून ऊर्जा बचत करणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी विद्युत नोंदणीकृत ठेकेदार/निर्माता (Manufacturer)/वितरक (Dealer) यांचेकडून विद्युत विषयक (Non DSR) बाबींचे दर सिलबंद कोटेशन्स मागविण्यात येत आहेत. कोणतेही एक कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मुख्याधिकारी अंबरनाथ नगरपरिषद यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली कोटेशन्स स्विकारले जाणार नाही तसेच खालील पैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास कोटेशन फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदरचे दर हे अंदाजपत्रक तयार करणे कामी मागविणेत येत असून सदर कामावर दर सादर करणेत येणाऱ्याचा कोणताही दावा असणार नाही. तरी अं.न.प. संकेतस्थळ/विद्युत विभागातून कोटेशन नमुना प्राप्त करून त्या प्रमाणे सर्व बाबींचा विचार करून इच्छुक विद्युत नोंदणीकृत ठेकेदार/निर्माता (Manufacturer)/वितरक (Dealer) यांनी प्रति युनिट प्रमाणे दर भरणेचे आहेत.

**कोटेशन उपलब्ध कालावधी** :- दि. २४/०७/२०२५ दु. १२.०० ते दि. ३०/०७/२०२५ दु. १२.०० पर्यंत
**कोटेशन उघडणे** :- दि. ३१/०७/२०२५ दु. ३.०० वा किंवा प्रशासकीय सोईनुसार

**अटी व शर्ती :- दर/कोटेशन सादर करणाऱ्यांनी खालील कागदपत्रे दरपत्रक सीलबंद लिफाफा सोबत सादर करणे अनिवार्य राहील.**

**अ) लिफाफा क्र. १ (आवश्यक कागदपत्रे)**
१. शासकीय इलेक्ट्रिकल कंत्राटदार (Gov. Electric License) / निर्माता (Manufacturer) / वितरक (Dealer) प्रमाणपत्र
२. पॅनकार्ड
३. GST नोदणी कागदपत्रे

**ब) लिफाफा क्र. २ (वित्तीय दरपत्रक-कोटेशन नमुना)**
१. लेटर हेडवर मुळ प्रतीतील सीलबंद दरपत्रक.
खालील अं.न.प. संकेतस्थळावर कोटेशन नमुना व सर्व तांत्रिक माहिती उपलब्ध आहे.
1. www.ambernathcouncil.net
(सदर कोटेशन सूचनेमध्ये तथा तांत्रिक बाबींमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर विभागाद्वारे कळविणेत येईल.)
2. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांचे कार्यालयातील सूचना फलक

सही/-
मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जावक क्रमांक : अंनप/विद्युत विभाग/2025-26/154

# वसई तालुक्यातील रुग्णालयात विनापरवाना औषधविक्री

## अन्न व औषध विभागाची कारवाई ● परवाना सरकारकडे जमा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार, ता. २३ (बातमीदार)**

> विनापरवाना एका खोलीमध्ये औषधविक्री करणाऱ्यावर पालघर जिल्हा अन्न व औषध विभागाने कारवाई केली. या विक्रेत्याकडून ८५ हजारांची औषधे जप्त करण्यात आली असून, दुकान सील करण्यात आले आहे
> ○ सहाय्यक आयुक्त महेश गाडेकर

### परवाना सरकारकडे जमा

संबंधित व्यक्तीचे यापूर्वीदेखील औषधविक्रीचे दुकान होते, मात्र त्याने स्वतःचा औषधविक्रीचा परवाना सरकारकडे जमा केला होता व त्यानंतर तो रुग्णालयात खोली घेऊन त्या ठिकाणाहूनच विनापरवाना औषधांचीविक्री करत होता.

वसई-विरार महापालिकेच्या दवाखान्यात अप्रमाणित औषधे मिळाल्याचे प्रकरण ताजे असतानाच आता वसई तालुक्यातील हॉस्पिटलमध्ये विनापरवाना एका खोलीमध्ये औषधविक्री करणाऱ्यावर पालघर जिल्हा अन्न व औषध विभागाने कारवाई केली. या विक्रेत्याकडून ८५ हजारांची औषधे जप्त करण्यात आली असून, दुकान सील करण्यात आल्याचे विभागाचे सहाय्यक आयुक्त महेश गाडेकर यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील औषध व अन्न प्रशासन विभागाला वसई पश्चिम येथे भाबोळा येथील नवजीवन हॉस्पिटलमध्ये एक व्यक्ती विनापरवाना औषधविक्री करत असल्याबाबतची माहिती मिळाली होती. प्रशासनाने याबाबतची खातरजमा करून संबंधित व्यक्तीकडे डॉक्टरांची औषधांची चिठ्ठी घेऊन त्यांच्याकडून औषधे घेतली व खात्री करून घेतली. या प्रकाराची खातरजमा झाल्यानंतर सहाय्यक आयुक्त महेश गाडेकर यांनी आपल्या पथकासह नवजीवन रुग्णालयामध्ये धाड टाकली. या धाडीमध्ये व्यक्ती एका खोलीमध्ये विनापरवाना औषध विक्री करण्याचा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. या औषधांमधील काही नमुने पुढील तपासासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. हा व्यक्ती मागील सात ते आठ महिन्यांपासून विनापरवाना औषधविक्री करत असल्याचे समजते.

### श्रीमलंग पर्वतरांगांमधील

# तावली पर्वतावर अडकलेल्या पर्यटकांची सुखरूप सुटका



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**बातमीदार**

**डोंबिवली :** पावसाळा सुरु झाला की पर्यटकांना निसर्गाच्या सानिध्यात ट्रेकिंगचे, भटकंतीचे वेध लागतात. कल्याण जवळील श्री मलंग पट्ट्यात सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये असलेल्या तावली पर्वतावर पर्यटक दरवर्षी येतात. मात्र पर्वतावरील वाटा माहित नसल्याने ते मार्ग चुकून भ्रकटतात. मंगळवारी मुंबईतील चार पर्यटक असेच फिरण्यासाठी तावली डोंगरावर गेले आणि वाट चुकल्याने हरवले. त्यांनी तात्काळ ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या 112 या हेल्पलाइनवर संपर्क साधून माहिती दिली. हिललाईन पोलिसांनी याची माहिती मिळताच नेवाळी बिट चौकीतील पथ काने क्षणाचाही विलंब न लावता पर्यटकांचा शोध घेण्यास सुरवात केली. पोलिसांच्या पथकाने अवघ्या 5 तासात मोबाईल टॉर्चच्या साहाय्याने या चौघाचा शोध घेत त्यांची सुखरूप सुटका केली.


ठाणे जिल्ह्यातील श्री मलंगगड भागातील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. मात्र परिसराची माहिती पर्यटकांना नसल्याने अनेकजण अडकून बसतात. मंगळवारी मुंबईच्या दादर परिसरातील चार तरुण तावली पर्वतावर भटकंतीसाठी आले होते. सकाळी ते तावली पर्वतावर गेले असता घनदाट जंगलात ते वाट चुकले, परतीचा मार्ग देखील सापडत नसल्याने चौघे घाबरले. मात्र त्यांनी तात्काळ ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या 112 नंबरवर संपर्क साधत पोलिसांकडे मदत मागितली.

पोलिसांना याची माहिती मिळताच हिललाईन पोलिसांना यासंदर्भात माहिती देण्यात आली. हिललाईन पोलिसांनी नेवाळी बिट चौकीतील पोलिस पथकाला याची माहिती दिली. हिललाईन पोलिसांकडून शोध संपर्क सुरु करण्यात आला होता.

दरम्यान घाबरलेल्या पर्यटकांचा फोन खोल दरीत पडल्याने त्यांच्याशी संपर्क साधने देखील पोलिसांना अवघड झाले होते. हिललाईन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप शिवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक अंकुश सुरेवाड, पोलीस हवालदार संदीप मुसळे, नाईक प्रशांत पाटील यांनी सुमारे पाच पेक्षा अधिक तास पर्वतावर शोध मोहीम घेतली. मोबाईल टॉर्चच्या उजेडात चौघाचा शोध घेतला जातं होता. अखेर त्यांचा शोध पोलिसांना लागला. पोलिसांनी सायंकाळी चौघांना सुरक्षितरित्या खाली उतरवत स्थानिक पोलिसांनी त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले

# मराठी रिसेप्शनिस्टवर हल्ला करणारा परप्रांतीय गोकुळ झा अखेर गजाआड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी**



## सराईत गुन्हेगार असल्याची धक्कादायक माहिती उघड
### चार दिवसांपूर्वी जामिनावर बाहेर आला होता

कल्याणमधील एका खासगी हॉस्पिटलमध्ये रिसेप्शनस्ट म्हणून काम करणाऱ्या मराठी तरुणीला बेदम मारहाण करणाऱ्या परप्रांतीय गोकुळ झा याला पोलिसांनी अटक केली आहे. तरुणीला मारहाण केल्यानंतर त्याने ओळख लपविण्यासाठी आपला लूक बदलल्याचे समोर आले पण मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याला एका शेतातून पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. दरम्यान गोकुळ झा याची आता गुन्हेगारीची कुंडलीच समोर आली आहे. तो सराईत गुन्हेगार आहे, त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याची धक्कादायक माहिती मिळतेय.

मराठी तरूणीला मारहाण झाल्याची माहिती मिळताच मनसे आक्रमक झाली. अविनाश जाधव यांनी आपल्या कार्यकर्त्यांना गोकुळ झा याला शोधण्याचे आदेश दिले, मनसेच्या कार्यकर्त्यांनी गोकुळ झाला याला पकडले. मनसे पदाधिकारी योगेश गव्हाणे यांनी गोकुळ झा याला शेतातून पळून जाताना पकडले अन् पोलिसांच्या ताब्यात दिले.

गोकुळवर कल्याण, कोळशेवाडी आणि उल्हासनगर परिसरात दरोडे तसेच मारहाणीचे अनेक गुन्हे नोंदवले गेले आहेत. कल्याण पूर्वेतील नांदिवली भागात तो फेरीवाल्यांकडून जबरदस्तीने हप्ते गोळा करत असल्याचीही माहिती समोर आली आहे. गोकुळ झाला कठोर शिक्षा होण्यासाठी त्याची सखोल चौकशी केली जात आहे. गोकुळ झा हा चार दिवसांपूर्वी जामिनावर बाहेर आला होता. त्याच्यावर यापूर्वी दोन गंभीर गुन्हे नोंदले गेले आहेत. मारहाणीचा तसेच हत्यार बाळगण्याचा गुन्हा त्याच्याविरोधात नोंदवला गेला आहे. याशिवाय विठ्ठलवाडी आणि कोळशेवाडी पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. कोळशेवाडी पोलीस ठाण्यात ट्रक चालकाच्या मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता, या गुन्ह्यात त्याला अटक झाली होती.

# गटारीसाठी तळीरामांना वनविभागाकडून नो एन्ट्री

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गटारीच्या पार्श्वभूमीवर ठाण्यातील येऊर परिसरात दोन दिवस प्रवेश वर्जित करण्यात आला असून वनविभागाने याबाबत नागरिकांना सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

येऊर, ठाणे येथील वनपरिसरात गटारीच्या निमित्ताने मद्यधुंद अवस्थेत गर्दी, गोंगाट, अस्वच्छता आणि निसर्गाची हानी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर वनविभागाने कठोर पवित्रा घेतला आहे. २३ आणि २४ जुलै रोजी येऊर वनक्षेत्र सर्वसामान्य नागरिकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत कोणालाही प्रवेश देण्यात येणार नाही, अशी स्पष्ट सूचना वन विभागाने दिला आहे.

वनविभाग, ठाणे शहर पोलीस, वाहतूक नियंत्रण शाखा, राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या संयुक्तरीत्या या दोन दिवसांसाठी नियोजन केले आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बोरिवली विस्तारातील येऊर वनक्षेत्र हे जैवविविधतेने समृद्ध असून येथील बंधारा, नाले आणि डोंगर भाग हे अतिसंवेदनशील आहेत. येथे होणारी गर्दी वन्यजीवांच्या अधिवासाला गंभीर धोका ठरते, असे वनविभागाने नमूद केले आहे.

———————

> **गेल्या काही वर्षांपासून गटारी निमित्ताने नागरिक मोठ्या संख्येने येऊरमध्ये गर्दी करत होते. मद्यप्राशन, ध्वनी प्रदूषण, असभ्य वर्तन, जंगलातील नाल्यांमध्ये आंघोळ, प्लास्टिक व काचांचा कचरा यामुळे निसर्गसंपत्ती आणि वन्यजीव धोक्यात येत होते. यामुळेच येऊर वनपरिसरात गटारी साजरी करणे, यंदा पूर्णपणे प्रतिबंधित करण्यात आला आहे.**
> - मयुर सुरवसे, अधिकारी वन परिक्षेत्र

# मुंबई-ठाण्यासह राज्यभरात पावसाची जोरदार बॅटिंग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई:** मुंबई : बऱ्याच दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने सोमवारी मुंबई, ठाणे, पालघर परिसरात संततधार कोसळत जोरदार बॅटिंग केली. जोरदार कोसळणाऱ्या पावसामुळे मुंबई शहरासह, उपनगरातील सखल भागात पाणी साचले होते. परिणामी, रस्ते व रेल्वे रुळावर पाणी आल्याने वाहतूकही २० ते २५ मिनिटे विलंबाने सुरू होती. यामुळे प्रवाशांचे अतोनात हाल झाले. दरम्यान, येत्या २४ तासांत मुंबई आणि उपनगरांत आकाश साधारणतः ढगाळ राहून मध्यम स्वरूपाचा पाऊस तसेच विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

नेहमीप्रमाणे अंधेरी सबवेमध्ये पाणी साचल्याने वाहतूक इतर मार्गाने वळवण्यात आली होती. तर वेस्टर्न एक्सप्रेस हायवे आणि लिंकिंग रोडवरही पावसाचा परिणाम दिसून आला. मालाड-कांदिवली लिंकिंग रोडवर वाहतूक कोंडी झाली.

महाराष्ट्रात सध्या मान्सूनने पुन्हा एकदा जोर धरला असून अनेक जिल्ह्यांत मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे. हवामान विभागाने राज्यातील विविध भागांसाठी पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत जोरदार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मुंबई उपनगरात रात्रीपासून संततधार सुरु असून कांदिवली, बोरिवली, अंधेरी, गोरेगावसारख्या भागांत अधूनमधून पावसाच्या सरी पडत आहेत. आकाशात काळे ढग दाटून आले असून विजांच्या कडकडाटासह पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### धरणाखालील गावांना सतर्कतेचा इशारा

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रात जोरदार पाऊस कोसळत आहे. यामुळे, मुंबई, ठाणे शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या मोडकसागर, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा धरणांतून विसर्ग सुरू झाल्याने या धरणांखालील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ हात आहे. यामुळे नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नदीच्या पाण्यात उतरण्यास मनाई करण्यात आली आहे



# शिवसेना युवा सेनेचा कल्याण तालुका कार्यकता मेळावा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका बाबत कार्यकत्याना मार्गदर्शन करण्यासाठी शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण तालुक्यातील शिवसैनिक, युवा सैनिक, महिला आघाडीचा मेळाव्याचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे व युवासेनेचे तालुका प्रमुख अमित देशमुख यांच्या वतीने गोवेली येथे करण्यात आले होते, महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली, उपस्थित पाहुणे यांचा सन्मान शिवसेना कल्याण तालुका वतीने करण्यात आला, यावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील, शिवसेना सचिव एकनाथ शेलार, जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, उपजिल्हा प्रमुख सुदामा पाटील, उल्हासनगर शहर प्रमुख राजेंद्र चौधरी, संपर्क प्रमुख विजय सुरोशी, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य अरुणा वाडेकर,सुमन खरात, डॉ पाटील, महिला आघाडी अध्यक्षा नमिता ठाकरे,युवती आघाडी अध्यक्षा प्रियांका राऊत,उपतालुकाप्रमुख दता भोईर,अशवीन वाघेरे, जयवंत कोर, आदेश चौधरी,सतिश चौधरी,कैलास रोहणे,तालुका सचिव निलेश सोनावणे, नितीन देसले, महेश चोरघे, महेश चौधरी यांच्या सह शिवसैनिक, युवा सैनिक, महिला आघाडी आदि उपस्थित होते,



यावेळी काहि कार्यकतै यांनी प्रवेश केला, तसेच काहि पदाधिकारी नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत, उपस्थित पाहुणे यांचे आभार तालुका प्रमुख वसंत लोणे यांनी मानले,

# ‘अनधिकृत बांधकामांचा वीजपुरवठा खंडित करा’

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामाला वीज पुरवठा करण्यात येऊ नये, असे मा. उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहेत. त्या अनुषंगाने, ठाणे महापालिका क्षेत्रात कार्यरत महावितरण आणि टोरँट या दोन्ही वीज कंपन्यांनी या आदेशाचे तंतोतंत पालन करावे, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

अनधिकृत बांधकामांना वीज पुरवठा करण्यात येऊ नये तसेच, वीज पुरवठा करताना संबंधित बांधकाम अधिकृत असल्याची खातरजमा वीज कंपन्यांनी करावी, या संदर्भात, मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बुधवारी दुपारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात महापालिका अधिकारी, महावितरण कंपनी आणि टोरँट वीज कंपनी यांच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली.

ज्या बांधकामासाठी वीज पुरवठा मागितला असेल त्या बांधकामांच्या अधिकृतपणाबाबत कागदपत्रांची खातरजमा केल्याशिवाय वीज पुरवठा न करणे हे वीज कंपन्यांचे कायदेशीर कर्तव्य आहे. केवळ प्रतिज्ञापत्र किंवा अर्ज यांच्या बळावर वीज पुरवठा करता येणार नाही. ही अतिशय महत्त्वाची आणि गंभीर बाब असून महापालिका आयुक्तांनी त्यासंदर्भात महावितरण आणि इतर वीज कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करावा. केवळ अधिकृत बांधकामालाच वीज पुरवठा केला जाईल यादृष्टीने पावले उचलावीत, असे मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या या आदेशाची सविस्तर माहिती आयुक्त राव यांनी बैठकीत दिली. यासंदर्भात, आजपासून दोन्ही कंपन्यांनी बांधकामाच्या अधिकृतपणाची खात्री केल्याशिवाय वीज पुरवठा देऊ नये, असे स्पष्ट निर्देशही दिले. ग्राहकांना त्रास होऊ नये आणि अनधिकृत बांधकामांना वीज पुरवठा होऊ नये यादृष्टीने या परिस्थितीतून कंपन्यांनी वरिष्ठ पातळीवर मार्ग काढावा. त्यासाठी महापालिकेच्या शहर विकास विभागाचेही सहकार्य घ्यावे, अशी सूचनाही आयुक्त राव यांनी या बैठकीत केली.

विजेसाठी अर्ज केल्यानंतर किती काळात वीज पुरवठा दिला पाहिजे यासाठी जशी मार्गदर्शक तत्वे आहेत. त्याचप्रमाणे, अनधिकृत बांधकामांना वीज जोडणी देता येणार नाही, हेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे त्यासाठी तातडीने कार्यपद्धती निश्चित करावी, असेही आयुक्त राव म्हणाले.


महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक संचालक नगर रचना संग्राम कानडे, उपायुक्त (मालमत्ता कर) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे, उपनगर अभियंता (विद्युत) शुभांगी केसवानी, विधी अधिकारी मकरंद काळे, महावितरणचे मुख्य अभियंता संजय पाटील, अधिक्षक अभियंता युवराज मेश्राम, टोरँट कंपनीचे महाव्यवस्थापक (वितरण) प्रवीणचंद्र पांचाळ, सहमहाव्यवस्थापक विनय बहल, जनसंपर्क अधिकारी शशिकांत कोठेकर उपस्थित होते.

# एमएमआरडीएच्या भुलभुलैय्या पासून नागरिकांनी सावधान-सी.आर.म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : काही दिवसापूर्वी वर्तमान पत्र, सोशल मिडिया , काही भुलावन घालणारे लेख ,तिसरी महामुंबई म्हणजे कुबेर नगरी,अगदी आराखड्या सहीत दाखविण्यात येत आहेत..त्याची चाचपणी करण्यासाठी,त्याचा विरोध काय होईल यासाठीचा प्रयत्न पेण तालुक्यातील जिते येथील मोजणीचा प्रयत्न केल्याचे समजते,आत्ता मैदानात उतरले,कोठे विरोध होईल,किती प्रमाणात होईल हे पाहावे ,यासाठीच हा प्रयत्न असावा.शेवटी आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना.मात्र सुपीक जमीन ,वडिलोपार्जित मालमत्ता ही जबरदस्तीने घेता येईल का ? शेवटी भू संपादन २०१३ कायदा (Right to fair compensation and transparancy in land Aquisition ) यामध्ये जमिनीसाठी बाजारभावा प्रमाणे योग्य मोबदला देणे बंधनकारक आहे.ते दुप्पट चौपट आहे.शिवाय पुनर्वसन,पुनर्व्यवस्था आवश्यक असते,त्यांचा कोणताही हक्क डावलता काम नये.असे प्रांजल मत पेण तालुक्यातील वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केले.

शेकडो वर्षापूर्वीची जमीन त्यांच्या हक्काच्या जीवनाचा स्रोत आहे.आणि तोच स्रोत कायमचा हिरावून घेतला जातो.आणि त्याच प्रकारची जमीन त्याला पुन्हा विकत घेता येणार नाही ते कटू सत्य.कोणताही विकास लोकजीवन भकास न करता ,विस्थापित न करता त्यांना सन्मानाने जगता आले पाहिजे .आणि तो जर मिळणार नसेल तर न्यायालयाचे द्वार ठोठावावे लागते.शेवटी संघर्ष हा आलाच.जमीन आमची आणि ती मिळवण्यासाठी खर्च वेळ जाईल ते वेगळेच. जमीन जबरदस्तीने घेतली जाणार असेल तर त्या जमिनीच्या मोबदल्यात त्या शेतकऱ्याला विकासक आहेत त्याने बरोबरीचा शेअर कायम स्वरुपी दिला पाहिजे. आणि तो रोजगार असेल तर पुढील पिढीत वर्ग होणारा पाहिजे. दुसरे महत्वाचे म्हणजे भू संपादन कायदा २०१३ आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे की ७० ते८० टक्के लोकांची सहमती पाहिजे.याचे उत्तम उदाहरण म्हणजे सेझ मध्ये झालेली जनसुनावणी होय यामध्ये ९० टक्के शेतकरी वर्गाचा विरोध दिसून आला.आत्ताच काही दिवसात जे.एस.डब्ल्यूचा तिसरा फेज सुरू करण्याबाबत जनसुनावणी घेण्यात येत आहे.तशी जनसुनावणी एम.एम.आर.डी.ए. का घेत नाही तसा आग्रह आहे ग्रामीण ते देशपातळीवरचे लोकप्रतिनिधी का करत नाहीत. लोकांचा विरोध जरी दिसून आला तरी नवीन नवीन तंत्र वापरून घरबसल्या सर्व्हे केला जाईल. हा सर्व्हे यातून खालील बाबी निदर्शनास येतात जमिनीची अचूक ओळख,गाव,गट क्रमांक,सद्यस्थितीचा वापर ,सुपीक ,नापीक,किंवा पडीक,डोंगराळ,मालकी



हक्काबाबत माहिती वगैरे. शिवाय वारसदाराची जंत्री. जमिनीवर कोणत्या प्रकारचे पीक घेतले जाते,किती पीक मिळते (आणेवारी) त्या जागेत कोणत्या वस्त्या, देवळे शाळा,समाज मंदिरे, क्रीडांगणे, तलाव, शेत तळे , स्मशान रस्ते, टाक्या, स्थानिक वापरातील मालमता ,सार्वजनिक, खाजगी मालमत्ता हा सर्व लेखाजोखा मोजला जातो. आणि मग सर्वंकष आराखडा तयार झाल्यावर भरपाईचे गणित, यासाठी सरकारी दबाव,जबरदस्ती,खाकी युनिफॉर्म, यासाठीचे चित्र तयार करून ,एक सुयोग्य वातावरण निर्मिती तयार केली जाईल.या सक्तीच्या सर्व्हेमुळे हक्काची जमीन जाईल,रोजगार बुडेल, जेव्हा प्रत्यक्ष जमीन घेतली जाईल तेव्हा काय ,काय सुविधा देणार,शेतकऱ्यांना उपजिविकेसाठी हातात काय देणार याचा कोठेही उल्लेख नाही,उरण,पनवेल मधील शेतकरी कित्तेक वर्ष लाभापासून वंचित आहेत.

एम.एम.आर.डी.ए. चा सर्व्हे फक्त आराखडा पुरता मर्यादित न राहता त्याचे दूरगामी परिणाम होणार असरल्याने मध्यवर्ती ठिकाणी रस्ते,वीज,रेल्वे, मॉल ,शाळा,दवाखाने दळणवळण साधने यांची सोय आहे त्याठिकाणी विकसित भूखंड देतात ते मोजकेच सुखी होतील .मात्र इतर शेतकऱ्यावर उपासमार ,आर्थिक संकटात सापडतील. सक्तीची मोजणी ही ग्रामीण लोकशाहीचा अनादर करणारी असेल,त्यापूर्वी ग्रामसभा ,लोकसहमती अनिवार्य आहे.लोकांच्या हातात रोख रक्कम दिली पाहिजे .रोजगार प्रत्येक कुटुंबाला दिला पाहिजे, विस्थापिताना घर,आरोग्य,शिक्षण या मूलभूत सुविधा दिल्या पाहिजे.मात्र कायदा सर्वांना समान आहे जबरदस्ती होता काम नये.कित्येक पिढ्या ज्या जमिनीने पोसल्या त्या विकता कामा नये,असे माझे मत, असल्याचे वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केले.शेवटी शेतकरी राजा आहे तो राजाचा वंश राहिला पाहिजे. सिंचनाचे पाणी येईल,जमीन सुजलाम सुफलाम होईल,शेताच्या बांधावर फळे,फुले पिकातील,मासे शेती जोमाने वाढेल, छोटे फॉर्म हाऊस पर्यटनासाठी पोषक ठरतील,समुद्र किनारे विकसित होतील, कारण अटलसेतू मुळे आपण तासाभरात मुंबईला जाऊ शकू ,उन्हाळ्यात समुद्र मार्गे जाऊ.नवीन पिढी आणि जुनी मार्गस्थ होणारी पिढी यांच्या विचारानेच सर्व घडेल.शेवटी आहे देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



धनाचा दास प्रभूचा दास होऊ शकत नाही. मनुष्य धनाचा लोभी झाला आहे त्यामुळे भक्ती छिन्न छिन्न झाली आहे. केवळ गुरू ज्ञान ऐकून भक्ती पूर्ण होत नाही. जे ज्ञान ऐकले त्याचे मनन करा. चिंतन करा. चिंतन करून आचरणात आणा. जीवनात उतरवा.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# भिवंडीत टेम्पो चालक व वाहतूक पोलिसांमध्ये हाणामारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी धडपडत आपले कर्तव्य बजावणाऱ्या एका वाहतूक पोलिसांला एका टेंपो चालकांने मारहाण केल्याची खळबळजनक घटना दुपारी घडली आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यापासून भिवंडी ठाणे महामार्गावर वाहतूक कोंडी मुळे प्रवासी नागरिक हैराण झाले आहेत. त्यामुळे दररोज या मार्गावर भांडण तंटे निर्माण होत आहेत. पूर्णा गावच्या हद्दीत दुपारी टेम्पो चालक हा वाहतूक कोंडी करत असताना कर्तव्यावर असलेले वाहतूक पोलिस विजय चव्हाण यांनी टेम्पो चालकास वाहन थांबवण्याचा इशारा दिला.परंतु टेम्पो चालकाने टेम्पो न थांबवत वाहतूक पोलिस व वॉर्डन यांनी टेम्पो चालकास थांबवून जाब विचारला असता.टेम्पो चालकाने शिवीगाळ करण्यास सुरवात केली. त्यामुळे संतप्त टेम्पो चालकास खाली उतरवण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिस करत असताना टेम्पो चालकाने वाहतूक पोलिस विजय चव्हाण यांना ठोसे मारण्यास सुरवात केली.या घटनेचा संपूर्ण प्रकार मोबाईल मध्ये चित्रित झाल्याने मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.या प्रकरणी विजय चव्हाण यांनी नारपोली पोलिस ठाण्यात टेम्पो चालका विरोधात तक्रार दाखल केली आहे..

# मराठी तरुणीला मारहाण करणाऱ्या आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रुग्णालयातील रिसेप्शनिस्ट मराठी तरुणीला एका परप्रांतीन कडून बेदम मारहाण प्रकरणी आरोपी गोकुळ झा आणि त्याचा भाऊ रणजीत झा या दोघांना मानपाडा पोलिसांनी अटक करत न्यायालयात हजर केले असता कल्याण न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.रविवारी कल्याण पूर्वेतील नांदिवली येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये रिसेप्शनिस्ट असणाऱ्या एका मराठी तरुणीला परप्रांतीयाकडून अमानुष मारण करण्यात आली. डॉक्टर एमआर यांच्याबरोबर बोलत आहे, तुम्ही थोडं थांबा, एवढेच बोलण्यामुळे गोकुळ झा नामक इसमाने त्या रिसेप्शनिस्ट मराठी तरुणीला लाथा बुक्क्याने अमानुष मारहाण केली. याबाबत मानपाडा पोलिसांत तरुणीने गुन्हा दाखल केला परंतु 24 उलटूनही पोलिसाना आरोपी सापडला नाही, ही बातमी कळताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये घेराव केला. पोलिसांनी शोध मोहीम हाती घेतली परंतु रात्री दहाच्या सुमारास मनसेचे कार्यकर्ते योगेश गव्हाणे मलंग रोडवरील नेवाळी दिशेने जात असताना त्यांना आरोपी गोकुळ झा दिसला आणि त्यांनी त्या आरोपी गोकुळ झा याला ताब्यात घेत पोलिसांच्या हवाली केले.

आज गोकुळ झा आणि त्याचा भाऊ रणजित झा याला पोलीसांनी कल्याण न्यायालयात हजर केले असता, सुनावणी वेळी गोकुळ झा याने माझ्यावर कारवाई केली म्हणत, माझ्या भावाला का ताब्यात घेतले असे सांगत त्याने न्यायालयात गोंधळ घातला. यावेळी न्यायाधीशांनी कायदेशीर प्रक्रियेत अडथळा आणण्याबाबत गुन्हा दाखल करण्याची तंबी दिल्यावर तो शांत झाला. यावेळी न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असता पोलिसांनी त्याची पोलिस कोठडीत रवानगी केली असल्याची माहिती फिर्यादी पिडीत तरुणीचे वकील हरीश नायर यांनी दिली. तसेच गोकुळ झा याच्यावर उल्हासनगर, कोळसेवाडी आणि मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचेही हरीश नायर यांनी सांगितले.

# डोंबिवली एमआयडीसी मधील फेज -१ कापड कंपनीला भीषण आग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली एमआयडीसी फेज वन मधील एरोसोल प्रायव्हेट लिमिटेड या कापड कंपनीला आज दुपारी बारा वाजता त्या सुमारास भीषण आग लागली प्राथमिक माहितीनुसार ही आज शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे समजते.



ही कंपनी कापड उत्पादनाशी संबंधित असल्यामुळे आग झपाट्याने पसरली घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आग योजनेचे शर्तीचे प्रयत्न चालू झाले. सर्वात दिलासादायक बाब म्हणजे या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही आज नियंत्रण आणण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू असून संबंधित अधिकारी परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

दुपारी अडीच नंतर आग आटोक्यात आली दरम्यान कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांनी पाहणी केली.

# सायबर गुन्हेगारी विरुद्ध कारवाईसाठी विद्यार्थी आघाडीतर्फे ठाणे पोलिस आयुक्तांशी भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : दिनांक २१/०७/२०२५ रोजी आपले मुरबाड मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार श्री. किसनजी कथोरे साहेब यांच्या मार्गदर्शनात आणि श्री. तुषार प्रभुदेसाई, संयोजक, विद्यार्थी आघाडी, कोकण विभाग, भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश ह्यांचे नेतृत्वात विद्यार्थी आघाडी तर्फे ठाणे जिल्हा पोलीस आयुक्त माननीय श्री. आशुतोष डुंबरे साहेब यांची भेट घेण्यात आली. सदर भेटी दरम्यान वाढत्या सायबर गुन्हेगारी बाबत चर्चा करण्यात आली. गुन्हेगारी रोखण्यासाठी व त्यापासून बचाव करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना व त्याकरिता घ्यावयाची खबरदारी याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. विद्यार्थी आघाडी आणि युवा वर्गाकडून जे काही सहकार्य पोलिसांना अपेक्षित आहे ते देण्याची ग्वाही सदर भेटीदरम्यान माननीय पोलीस आयुक्त साहेबांना देण्यात आली.

सदर समयी श्री. तुषार प्रभुदेसाई, संयोजक, विद्यार्थी आघाडी, कोकण विभाग, भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश, ॲड. प्रद्युम्न ठाकुरदेसाई, संयोजक, विद्यार्थी आघाडी, भारतीय जनता युवा मोर्चा, ठाणे ग्रामीण, कु. ऋतुपर्ण दीक्षित, सदस्य, विद्यार्थी आघाडी, भारतीय जनता युवा मोर्चा, ठाणे ग्रामीण, श्री. रोहित सबनीस, संयोजक, विद्यार्थी आघाडी, भारतीय जनता युवा मोर्चा, बदलापूर (पूर्व) आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ठाणे महापालिकेतर्फे

# परिमंडळ लोकशाही दिनाचे आयोजन

## दि. ४ ऑगस्ट, २०२५ पूर्वी निवेदन सादर करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार, १८ ऑगस्ट, २०२५ रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी आपली निवेदने ४ ऑगस्टपूर्वी सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.

परिमंडळ १ - (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा

परिमंडळ २ - (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत, उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

परिमंडळ ३ - (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील. नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत.

## नांदकर येथे विविध मान्यवरांच्या हस्ते

# विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील नांदकर येथील एका शाळेत दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचां गुणगौरव सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही नांदकर सांगे गृप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच व समाजसेवक मनोज प्रकाश पाटील यांच्या संकल्पनेतून माध्यमिक विद्यालय नांदकर या शाळेत दहावी गुंणवत व सर्व उत्तीर्ण



विद्यार्थ्यांचां गुणगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पारितोषिक, प्रशस्तीपत्र, देऊन सन्मानीत करण्यात आले तर इतर विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांचां उस्फूर्त प्रतिसाद मिळाला तर या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते प्रकाश पाटील भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार शांताराम मोरे शिवसेना तालुकाप्रमुख इंद्रपाल तरे माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्णा वाकडे महीला आघाडी प्रमुख फशीताई पाटील ठाणे जिल्हा ओबीसी संघर्ष समिती सरचिटणीस प्रमोद जाधव शिवसेना तालुका सचिव भावना ढमणे, सुभाष भामरे, दशरथ पाटील उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच विलास जाधव, निलेश कोळी, सुरज खंडागळे, रोशन पाटील, विकास भोईर, विजय घरत, संकेत घरत, विजय थेटे, वैभव थेटे, अनिकेत दळवी अविनाश घरत, जयवंत घरत, बबलु जाधव, अभय चव्हाण, यांनी मेहनत घेतली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# केडीएमसी शिक्षण विभागातर्फे आता ‘घर घर संविधान’

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासनाचा "घर-घर संविधान" हा उपक्रम शालेय शिक्षण विभागामार्फत नोव्हेंबर 2024 पासून राबविला जात आहे.क.डों. मनपा अंतर्गत क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये हा उपक्रम सुरूच आहे परंतु त्याचे विस्तृत स्वरूपामध्ये रूपांतर करून तो सर्व शाळांच्या माध्यमातून घराघरापर्यंत पोहोचावा या उद्देशाने प्रचार आणि प्रसार करण्यासाठी नुकतेच मुख्याध्यापकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये कल्याण डोंबिवली मनपाच्या एकूण 60 शाळांच्या मुख्याध्यापकांना बोलविण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शन नूरखा पठाण सर, संविधान अभ्यासक (सुजाण नागरिक संस्था माणगाव) तसेच माणगाव पंचायत समिति, माणगाव ,जिल्हा रायगड , यांनी केले.शिक्षण विभाग, पंचायत समिति माणगाव अंतर्गत हा उपक्रम नियोजनबद्ध पद्धतीने राबविला गेला आणि संविधानाचे महत्त्व हे नागरिकांपर्यंत कशा पद्धतीने पोहोचविले यासंदर्भात त्यांनी सर्वांना अवगत केले आणि क.डों. मनपा क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये सुद्धा हा उपक्रम तसाच राबविला जावा या संदर्भात मार्गदर्शन केले. क.डों.मनपा शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी सुद्धा या कार्यक्रमासाठी समिती गठीत केली असून सर्व सीआरसी प्रमुख आणि सर्व मुख्याध्यापक यांना या कार्यक्रमाचे नियोजन करायला सांगितलेले आहे. "घर घर संविधान" हा उपक्रम, मनपा क्षेत्रात संविधानाचे महत्त्व सर्व नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी खूप मोलाचा ठरणार आहे यामुळे विद्यार्थी तसेच पालक सुद्धा आपल्या संविधानाच्या बाबतीत जागरूक होतील अशी माहिती विजय सरकटे यांनी यावेळी दिली.

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.